2 MAR 2019
तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीधरांनी नव्या वाटा शोधाव्यात

## कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर आजरा महाविद्यालयात पदवीदान समारंभ उत्साहात

प्रतिनिधी
आजरा

पदवी प्राप्त केल्यानंतर विद्यार्थ्यांनी आता करीअरच्या नव्या वाटा शोधाव्यात असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर यांनी केले. आजरा महाविद्यालयात आयोजित केलेल्या पदवी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

स्वागत व प्रास्ताविक डॉ. आनंद बल्लाळ यांनी केले. यावेळी नांदवडेकर म्हणाले, तरूणांनी स्थानिक समस्यांचा अभ्यास करून त्यांचे निराकरण करण्यासाठी नवनवीन व्यवसायांच्या संधी शोधाव्यात. ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी कठोर परीश्रम करा. योग्य दिशेने केलेल्या परीश्रमाला यश निश्चित



आजरा : शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. डी. नांदवेकर यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र स्वीकारताना वर्षा कांबळे यावेळी उपस्थित डॉ. बी. एम. मोहिते, प्राचार्य डॉ. एम. एल. होनगेकर, के. व्ही. येसणे, एम. एल. चौगुले

मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. ध्येयप्राप्तीच्या प्रवासात अपयश आले म्हणून खचून जावू नका. झालेल्या चुका टाळून सकारात्मकतेने व आत्मविश्वासाने प्रयत्न केले तर तुम्ही पाहिलेले स्वप्न साकार होईल असा विश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य एम. एल. चौगुले म्हणाले, आजरा महाविद्यालय ग्रामीण भागात कार्यरत असताना विद्यापीठ स्तरावरती उत्तम नावलौकीक आहे. येथून गुणवत्ता संपन्न विद्यार्थी घडविले जातात याचा आपल्याला अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. जनता शिक्षण संस्थेचे संचालक के. व्ही. येसणे यांनी संस्थेच्या स्थापनेपासून महाविद्यालयात संपन्न होणारा हा पहिलाच पदवीदान समारंभ असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांची गुणवत्ता ही परिक्षेच्या गुणावर अवलंबून नसते तर त्या विद्यार्थ्याने स्वतःमध्ये घडविलेला व्यक्तीमत्व विकास त्यांच्या भविष्यातील यशासाठी कारणीभूत असतो असे मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाला पदवीधर, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. प्रा. अविनाश वर्धन, डॉ. अशोक बाचुळकर यांनी सूत्रसंचल केले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठातर्फे उद्या चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा पत्रकारिता व जनसंवाद विभाग, कोल्हापूर प्रेस क्लब यांच्यातर्फे बुधवार (दि. १३) 'निवडणुका आणि सोशल मीडिया' या विषयावर चर्चासत्र होणार आहे.

अर्थशास्त्र विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये सकाळी साडेदहा वाजता जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे छायाचित्रकार सुधारक ओलवे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे आहेत. यावेळी विभागीय माहिती संचालक सतीश लळीत, आयटी तज्ज्ञ राजेंद्र पारिजात, आदी मार्गदर्शन करणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार यांनी दिली.

# ‘राष्ट्रीय एकात्मतेसाठी हिंदी आवश्यक’

**कोल्हापूर :** भारतासारख्या बहुधर्मी, बहुभाषी, बहुप्रांतीय देशात राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी हिंदी एकमेव भाषा उपयोगी आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण यांनी केले. हिंदी प्रचार केंद्र, कोल्हापूर यांच्या वतीने हिंदी प्रचारकांचे संमेलन नुकतेच पार पडले, यावेळी ते बोलत होते. यावेळी हिंदी प्रचार केंद्राचे अध्यक्ष डॉ. एन. व्ही. केसरकर, प्रा. अविनाश पाटील, डॉ. रंगनाथ भुयेकर, दीपक यादव, सत्यवान कोत्रे, विमल शिंगाडे, सागर मानुगडे आदींनी विचार मांडले.

सकाळ

# ‘निवडणुका, सोशल मीडिया’वर सेमिनार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा पत्रकारिता व जनसंवाद विभाग, कोल्हापूर प्रेस क्लब व सोलापूरमधील अहल्याबाई होळकर विद्यापीठातर्फे बुधवारी (ता. १३) ‘निवडणुका आणि सोशल मीडिया’ विषयावर एकदिवसीय सेमिनार होत आहे. अर्थशास्त्र विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये सकाळी साडेदहाला जिल्हाधिकारी दौलतराव देसाई यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन होणार आहे. विभागीय माहिती संचालक सतीश लळीत, आयटी तज्ज्ञ राजेंद्र पारिजात मार्गदर्शन करणार आहेत. सेमिनारसाठी विद्यार्थी, पत्रकार, अभ्यासकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन पत्रकारिता विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार, प्रेस क्लबचे अध्यक्ष विजय पाटील तसेच सोलापूरच्या पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर यांनी केले आहे.

Kolhapur, Kolhapur-Today
12/03/2019 Page No. 2

12 MAR 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाळासाहेब देसाईंचा इतिहास नव्याने सांगावा

## ज्येष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक शरद कारखानीस यांचे प्रतिपादन: विद्यापीठातर्फे व्याख्यान उत्साहात



कोल्हापूर : विद्यापीठातील बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या वतीने आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ पत्रकार शरद कारखानीस, सोबत डॉ. अवनिश पाटील, डॉ. नंदा पारेकर, विश्वनाथ पानसकर.

प्रतिनिधी
कोल्हापूर

बदलत्या युगात १९८३ साली निधन झालेल्या लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे स्मरण करणे कौतुकास्पद गोष्ट आहे. त्यांनी बांधकाममंत्री असताना मुंबई-गोवा मार्ग, कोल्हापूर-कोकण मार्ग सुरू करून दळण-वळणाची साधने उपलब्ध करून दिली. तर शिक्षणमंत्री असताना आकराशे रूपयेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील मुलांना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. म्हणून इतिहास अभ्यासकांनी लोकनेते बाळासाहेब देसाई यांचा इतिहास नव्याने सांगण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व राजकीय विश्लेषक शरद कारखानीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनाच्या वतीने लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात प्रमुख पाहुणे ते बोलत होते. शाहू स्मारक भवन येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर होत्या.

यावेळी बोलताना कारखानीस पुढे म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई हे मूळचे सातारा पाटण येथील होते. मात्र त्यांचे १० वीनंतचे शिक्षण कोल्हापुरात झाले. राजाराम हायस्कूल व कॉलेजमध्ये शिकताना ते वारावर जेवत होते. याच काळात त्यांची जडण-घडण झाली. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी गरीबांच्या मुलांना शिक्षण मिळावे यासाठी वसतिगृहांची स्थापना केली. शाहूंचे कार्य पुढे नेण्याचे काम देसाई यांनी केले. जिल्हा परिषद सदस्य, लोकल बोर्डाचे अध्यक्ष ते बांधकाममंत्री, शिक्षणमंत्री अशी त्यांची राजकीय कारकीर्द होती. तसेच कोल्हापूर-कोकण जोडावा म्हणून गगनबावडा व करूळ घाट फोडून रस्ता तयार केला. हा इतिहास तरुणाईपर्यंत पोहचवण्याचे काम इतिहासकारांनी केले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागाचे डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. स्नेहल पाटील यांनी सुत्रसंचालन केले. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले. यावेळी पत्रकार दशरथ पारेकर, माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. अरुण भोसले, प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण, प्राचार्य डॉ. विलास पवार, अरुणचंद्र देसाई, शिवराज देसाई, प्रा. सुरेश शिखरे, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. नंदकुमार मोरे, ज्येष्ठ इतिहास अभ्यासक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.